ग्रामीण पशुधन योजना online apply MahaDBT 2.0

शेतकरी मित्रांनो, महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाच्या योजनांसाठी आता **MahaDBT 2.0** (mahadbt2.maharashtra.gov.in) पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करता येतो. दुधाळ गाय / म्हैस, शेळी-मेंढी, कुक्कुटपालन अशा योजनांसाठी अर्ज कसा करायचा, हे या लेखात आपण **महा आयडी नोंदणीपासून अर्ज सादर करेपर्यंत** स्क्रीनशॉटसह step by step पाहणार आहोत.


सुरू करण्यापूर्वी हे तयार ठेवा

- **आधार क्रमांक** (किंवा Virtual ID) आणि आधारशी जोडलेला मोबाईल क्रमांक – OTP साठी
- **शिधापत्रिका (रेशन कार्ड) क्रमांक** – Profile मध्ये हा रकाना अनिवार्य आहे
- **शेतकरी ओळख क्रमांक (Farmer ID)** – जमीन आवश्यक असलेल्या योजनांसाठी. जमीन आणि Farmer ID नसल्यास भूमिहीन किंवा वनहक्कधारक यापैकी योग्य पर्याय निवडून अर्ज करता येतो.

संपूर्ण प्रक्रिया एका दृष्टिक्षेपात

MahasarkariYojana.in

आधी **महा आयडी तयार करा**, त्यानंतर साधारण २४ तासांनी MahaDBT 2.0 वर Login करून योजनेसाठी अर्ज करा.



MahasarkariYojana.in

महा आयडी ते योजनेसाठी अर्ज – पूर्ण प्रक्रिया

भाग १: महा आयडी नोंदणी

Step 1: पोर्टल उघडा आणि Register करा

1. **mahadbt2.maharashtra.gov.in** हे पोर्टल उघडा.
2. वरील उजव्या कोपऱ्यातील **“Register”** बटण दाबा.
3. **“तुमचा महाआयडी तयार करा”** हे पान उघडते.



MahaDBT 2.0 पोर्टल – Register आणि Login बटण


Step 2: आधार क्रमांक आणि OTP

1. **आधार क्रमांक** (किंवा Virtual ID) टाका.
2. **eKYC संमती** वाचून चौकट टिक करा.
3. **“OTP पाठवा”** दाबा आणि मोबाईलवर आलेला OTP टाकून पडताळणी करा.

टीप: आधार नसल्यास “रेशन कार्ड वापरून नोंदणी करा” निवडा.

⚠ OTP कोणालाही सांगू नका.

MahasarkariYojana.in



आधार क्रमांक, eKYC संमती आणि OTP


Step 3: महा आयडी तयार करा

1. OTP पडताळणी झाल्यावर आपली आधार माहिती तपासा.
2. आवश्यक संमती देऊन महा आयडी तयार करा.

> ⚠ महा आयडी तयार व्हायला साधारणतः **२४ तास** लागतात. त्यानंतरच Login करता येते.

भाग २: Login करा

1. मुख्य पृष्ठावर **"Login"** दाबून **"Citizen Login"** निवडा.
2. **"महा आयडी"** टॅब निवडून महा आयडी टाका (किंवा **"आधार"** टॅब).
3. **"लॉगिन"** दाबा; आधारशी जोडलेल्या मोबाईलवरील OTP टाका.




MahasarkariYojana.in

Citizen Login – महा आयडी किंवा आधार

भाग ३: पशुसंवर्धन योजना निवडा

1. **“योजनेसाठी अर्ज करा”** पानावर **“Scheme Type”** उघडा.
2. **“Animal Husbandry Scheme For Farmer”** निवडा.




Scheme Type – Animal Husbandry Scheme For Farmer

MahasarkariYojana.in

भाग ४: Profile पूर्ण करा

अर्जदाराचा तपशील

1. नाव, जन्मतारीख, लिंग आधारवरून **आपोआप** येतात.
2. सामाजिक वर्ग, दिव्यांग (होय/नाही), सुशिक्षित बेरोजगार (होय/नाही) आणि **शिधापत्रिका क्रमांक** भरा.
3. लाल तारा (*) असलेले सर्व रकाने अनिवार्य आहेत.




अर्जदाराचा वैयक्तिक तपशील

MahasarkariYojana.in

जमिनीचा तपशील

1. Farm ID, गाव, सर्वे क्रमांक, क्षेत्र **आपोआप** येते.
2. माहिती बरोबर असल्यास **“जमिनीच्या तपशीलाची पुष्टी करा”** दाबा.
3. जमीन आवश्यक असलेल्या योजनांसाठी **Farmer ID (AgriStack)** आवश्यक आहे.

> **टीप:** जमीन आणि Farmer ID नसल्यास भूमिहीन किंवा वनहक्कधारक यापैकी योग्य पर्याय निवडून अर्ज करता येतो.



जमिनीचा तपशील आणि पुष्टी

MahasarkariYojana.in

घोषणा आणि जतन

1. तीन घोषणा **वाचूनच** टिक करा.
2. **“जतन करा”** दाबा – Profile पूर्ण होते आणि “पात्र योजना” उपलब्ध होतात.

> ⚠ घोषणा ही आपली कायदेशीर हमी आहे; माहिती खरी असेल तरच टिक करा.



Profile घोषणा आणि जतन करा

भाग ५: पात्र योजना पाहा

1. **“पात्र योजना”** टॅबवर Profile नुसार योजना दिसतात.
2. योजनेचे नाव शोध पेटीत टाकून शोधता येते (उदा. dairy).
3. हव्या त्या योजनेसमोरील **“अर्ज करा”** दाबा.



पात्र योजना यादी आणि अर्ज करा बटण

भाग ६: उदाहरण – दुधाळ गाय / म्हैस योजनेचा अर्ज

MahaSarkariYojana.in

उदाहरणासाठी आपण **“५ दुधाळ गाय / म्हैस संगोपन प्रकल्पाद्वारे उद्योजकता विकास”** ही योजना घेऊ.

Step 1: जनावर आणि जात निवडा

1. पात्र योजना यादीतून या योजनेसमोरील **“अर्ज करा”** दाबा.
2. खरेदी करायचे जनावर (**गाय किंवा म्हैस**) आणि जातीचा प्रकार (**संकरित / देशी**) निवडा.

> **टीप:** “प्रकल्प अंमलबजावणीचे ठिकाण” मध्ये Profile मधील जमीन आपोआप निवडली जाते (एकच जमीन असल्यास).




योजनेचा तपशील – जनावर आणि जात निवड

Step 2: भाडेपट्ट्याची जमीन (गरज असल्यास)

1. **“तुम्ही भाडेतत्त्वावर जमीन घेणार का?”** यात “होय” किंवा “नाही” निवडा.
2. मालकी जमीन योजनेसाठी आवश्यक क्षेत्रापेक्षा कमी असल्यासच हा प्रश्न दिसतो. “होय” निवडून किमान कमी पडणाऱ्या क्षेत्राइतकी (उदा. ०.२ हे.) मूळ जमिनीलगतची भाडेपट्ट्याची जमीन भरा.
3. मालकी जमीन कमी असल्यास भाडेपट्ट्याची जमीन मिळून आवश्यक क्षेत्र पूर्ण झाले पाहिजे.

⚠ भाडेपट्ट्याची जमीन खरोखर उपलब्ध असेल तरच “होय” निवडा.

MahasarkariYojana.in



भाडेपट्ट्याची जमीन

MahasarkariYojana.in

Step 3: घटक (Components) निवडा

1. यादीतून आवश्यक घटक निवडा – एकूण किंमत व अनुदान तिथेच दिसते.
2. काही घटक आपोआप निवडलेले असतात.




घटक निवड – किंमत आणि अनुदान

Step 4: घोषणा आणि अर्ज दाखल करा

1. तीन घोषणा वाचून टिक करा.
2. **“पूर्वावलोकन / प्रिंट”** ने तपासा; **“मसुदा म्हणून जतन करा”** ने नंतर पूर्ण करता येतो.

3. सर्व माहिती ठीक असल्यावर **“अर्ज दाखल करा”** बटण दाबा.



घोषणा आणि अर्ज दाखल करा

भाग ७: “माझे अर्ज” मध्ये स्थिती पाहा

1. **“सादर केले”** व **“मसुदा अर्ज”** येथे दिसतात.
2. SMS आणि पोर्टलवरील स्थिती वेळोवेळी तपासा.



माझे अर्ज – सादर केले, मसुदा अर्ज

अर्ज दाखल झाल्यानंतर पुढे काय?

टप्पा	काय करायचे	मुदत
प्राथमिक निवड	FCFS पद्धतीने; SMS येईपर्यंत प्रतीक्षा	–
कागदपत्रे अपलोड	प्राथमिक निवडीनंतर	१० दिवस
त्रुटी पूर्तता	छाननीत त्रुटी आल्यास दुरुस्ती करून पुन्हा सादर करा	५ दिवस

टप्पा	काय करायचे	मुदत
पूर्व-संमती आदेश	यानंतरच खरेदी / कामाला सुरुवात करा	–
बंधपत्र	ऑनलाइन बंधपत्रास सहमती द्या	–
दावा अपलोड	काम / खरेदी पूर्ण करून देयके, पावत्या व जिओ-टॅग फोटो अपलोड करा	योजनानिहाय / टप्पानिहाय
तपासणी व मंजुरी	तालुका ते जिल्हा स्तरावरील अधिकारी	–
अनुदान जमा	आधार संलग्न बँक खात्यात DBT द्वारे	–

⚠ मुदत चुकल्यास निवड किंवा अर्ज रद्द होऊ शकतो.



अर्ज दाखल झाल्यानंतरची प्रक्रिया

मदतीसाठी संपर्क

- **पशुसंवर्धन विभाग – टोल फ्री:** 1962
- **WhatsApp चॅटबॉट:** 9063142299
- **तांत्रिक अडचण – महाआयटी:** 022-49150800

जवळचा पशुवैद्यकीय दवाखाना, तालुका व जिल्हास्तरीय पशुसंवर्धन कार्यालय येथेही संपर्क साधता येतो.

निष्कर्ष

MahaDBT 2.0 वर पशुसंवर्धन योजनेसाठी अर्ज करणे आता सोपे आहे: आधी महा आयडी तयार करा, २४ तासांनी Login करा, Profile पूर्ण करा, पात्र योजना निवडा, घटक निवडा आणि अर्ज दाखल करा. ही माहिती उपयोगी वाटली तर आपल्या शेतकरी मित्रांसोबत नक्की शेअर करा.

अधिकृत पोर्टल: mahadbt2.maharashtra.gov.in

MahasarkariYojana.in